# दि कल्याण जनता सहकारी बँक लि. (शेड्युल्ड बँक)

## ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

रविवार दि. १४.०८.२०१६ रोजी बँकेची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नवरंग बँक्वेट हॉल, फोर्टिस हॉस्पिटलजवळ, बैलबाजार, कल्याण (प.) येथे दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

ठीक दु. ३.०० वाजता गणसंख्या १०० होती. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी जाहीर केले की, सभेस आवश्यक ती गणसंख्या नसल्याने सभा अर्धा तास तहकुब केली जात आहे. सदर सभा अर्ध्या तासानंतर म्हणजे ठीक ३.३० वाजता भरेल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही. त्यानंतर ठीक दु. ३.३० वाजता सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत करुन सभेची सूचना वाचून दाखविली. तसेच अहवालातील मुद्रणदोष सांगितले.

मा. अध्यक्ष ॲड. श्री. सुरेश पटवर्धन यांनी सर्व सभासदांचे स्वागत केले व ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मा. संचालक श्री. हेमल रवाणी यांना सभेपुढे कायम करण्यासाठी ठेवावे असे सुचविले.

**विषय : रविवार दि. १३.०९.२०१५ रोजी झालेल्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

रविवार दि. १३.०९.२०१५ रोजी झालेल्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मा. संचालक श्री. हेमल रवाणी यांनी सभेसमोर सादर केले. सदर इतिवृत्ताच्या छापील प्रती सभासदांना आधीच उपलब्ध करून देण्यात आलेल्या होत्या. यानंतर मा. अध्यक्ष ॲड. सुरेश पटवर्धन यांनी सभेपुढे ठराव मंजुरी करिता मांडला.

सदर ठराव कायम करणेपूर्वी काही सभासदांनी प्रश्न उपस्थित केले.

सभासद श्री. अरुण शिंपी यांनी सभेत इतिवृत्त वाचले गेले पाहिजे असा आग्रह धरला. सभाशास्त्राच्या नियमानुसार इतिवृत्त वाचून दाखवावे असेही त्यांनी सांगितले. यावर अन्य सभासदांनी इतिवृत्ताच्या छापील प्रती उपलब्ध करुन दिल्याने पुन्हा इतिवृत्त वाचण्याची आवश्यकता नाही असे सांगितले.

मा. अध्यक्ष ॲड. सुरेश पटवर्धन यांनी सांगितले की, श्री. शिंपी यांच्या प्रश्नाचे उत्तर सभेने दिले असून, इतिवृत्त वाचण्याची आवश्यकता नसल्याचे बहुतेक सभासदांचे मत आहे.

सभासद श्री. उदय दीक्षित यांनी वाडेघर चौक सुशोभिकरण संदर्भात प्रश्न उपस्थित केला.

४२ वर्षानंतर बँकेने सुशोभिकरण करण्याची काय गरज होती? याचे उत्तर बँकेने दिलेले नाही. तसेच हे काम कोणत्या संस्थेस दिले होते? त्यासाठी निविदा मागवली होती का? याची माहिती उपलब्ध करुन दिली नाही या खर्चाऐवजी बँकेने सभासदांसाठी व वरिष्ठ नागरिकांसाठी सोयी उपलब्ध करुन दयाव्यात असे सांगितले. आताही माझा तोच प्रश्न असून याचे उत्तर मिळाले नाही.

श्री. दीक्षित यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यावर उत्तर देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की, श्री. दीक्षित व अन्य काही सभासदांनी जवळपास ४० मुद्दयांचा अर्ज सहकार आयुक्तांकडे केला आहे. त्यांनी तो अर्ज उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे यांचेकडे पाठविला आहे. त्यांच्याकडे या अर्जावर सुनावणी चालू आहे. वाडेघर चौकाचा मुद्दा सदर अर्जात समाविष्ट आहे. सदर अर्जावर सुनावणी सुरु असल्यामुळे या प्रश्नाचे आणि सदर

पत्रामध्ये उपस्थित केलेल्या इतर मुद्दयांचे उत्तर सभेत देणे संयुक्तिक होणार नाही. अन्य सभासदांनीही याकरिता सहमती दर्शवित, याचे उत्तर सभेत देणे संयुक्तिक होणार नाही, यासाठी पाठिंबा दिला.

तद्‌नंतर मा. अध्यक्षांनी सभेपुढे ठराव मंजुरी करिता मांडला.

ठराव क्र. १) रविवार दि. १३.०९.२०१५ रोजी झालेल्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त **मा. संचालक श्री. हेमल रवाणी** यांनी सभेपुढे मांडले. त्यास ही सभा कायम करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. रविशंकर शुक्ला | सभासद क्र. १६४३९ |
| अनुमोदक : | श्री. अरुण हरी महाजन | सभासद क्र. ३८०१ |
| | ठराव बहुमताने मंजूर. | |

यानंतर मा. अध्यक्षांनी बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. मधुसूदन पाटील यांना अहवाल सालात देवाज्ञा झालेल्या मान्यवर व्यक्ती व सभासद यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सूचित केले व सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहण्याची विनंती केली.

ठराव क्र. २ : **दुखवट्याचा ठराव -**

अहवाल सालात ज्या मान्यवरांचे व सभासदांचे निधन झाले त्यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून ही सभा श्रध्दांजली वाहत आहे. माजी लोकसभा अध्यक्ष - पी. ए. संगमा, अंदमान निकोबारचे माजी राज्यपाल व ठाणे लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार - रामभाऊ कापसे, जम्मु काश्मीरचे मुख्यमंत्री - मुफ्ती महंमद सईद, अरुणाचल प्रदेशचे माजी मुख्यमंत्री - कालिखो पुल, शेतकरी संघटनेचे नेते व माजी खासदार - शरद जोशी, माजी आमदार - हरिश्चंद्र पाटील, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे माजी महापौर - मंगला शिंदे, भारतीय जनसंघाचे माजी अध्यक्ष व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते- बलराज मधोक, विश्व हिंदु परिषदेचे माजी अध्यक्ष - अशोकजी सिंघल, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक / माजी सहसरकार्यवाह - सुरेशराव केतकर, अखिल भारतीय धर्म जागरण प्रमुख - मुकुंदराव पणशीकर, कम्युनिस्ट पक्षाचे नेते - ए. बी. वर्धन, राज्याचे माजी पोलिस महासंचालक - सूर्यकांत जोग, मॅगॅसेसे, ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या, पद्मविभूषण - महाश्वेतादेवी, कविवर्य व पद्मभूषण - मंगेश पाडगावकर, ज्येष्ठ अभिनेत्री - सुलभा देशपांडे, ज्येष्ठ पत्रकार - अरुण टिकेकर, ज्येष्ठ समीक्षक व लेखक - द. भि. कुलकर्णी, लोकसाहित्य व संत साहित्याचे अभ्यासक व संशोधक - रा. चिं. ढेरे, ज्येष्ठ लेखिका- वसुंधरा पेंडसे - नाईक, ज्येष्ठ पार्श्वगायिका - मुबारक बेगम, अभिनेत्री - साधना, अभिनेते - शेखर नवरे, ग्वाल्हेर घराण्याच्या गायिका - वीणा सहस्त्रबुध्दे, प्रसिध्द उद्योजक - जयकुमार पाठारे आणि महाड पूल दुर्घटनेत बळी गेलेले नागरिक.

## दिवंगत सभासदांची यादी

| अनु. क्र. | सभासद क्र. | सभासदाचे नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १. | ४३२८८ | फुटाणे शुभांगी रमेशचंद्र | १२.०१.२०१५ |
| २. | ४२१५५ | घुगे लक्ष्मण हरीभाऊ | ०६.०२.२०१५ |
| ३. | ४८६४० | ढग्गा बिशंबर दयाळ | ०९.०२.२०१५ |
| ४. | १३० | करमरकर दिगंबर रामकृष्ण | १५.०२.२०१५ |
| ५. | ४२५७४ | वसाणी नटवरलाल अमृतलाल | १५.०३.२०१५ |
| ६. | ११०८० | ढोबळे गजानन श्रीधर | १७.०३.२०१५ |
| ७. | ४०६४२ | पाटील जगन्नाथ नामदेव | २३.०३.२०१५ |
| ८. | ४६४०४ | येवले रमेश एकनाथ | २४.०३.२०१५ |
| ९. | ३१०७२ | खर्डेकर मनोहर भिका | २६.०३.२०१५ |
| १०. | ४४०४ | ताम्हाणे अनंत जगन्नाथ | ३०.०३.२०१५ |
| ११. | ४३५५७ | ठक्कर राजेश कांतीलाल | ०१.०४.२०१५ |
| १२. | २८२९३ | सोनी अरुणा जयंतकुमार | ०१.०४.२०१५ |
| १३. | २९४४३ | जाधव धनदत्त गंगाराम | ०८.०४.२०१५ |
| १४. | ५००८७ | नामजोशी शाम परशुराम | ०८.०४.२०१५ |
| १५. | २४४३६ | ठोके सोमा राघो | ०९.०४.२०१५ |
| १६. | २७५८० | ठाकूर अनिल वासुदेव | १४.०४.२०१५ |
| १७. | ३५८३१ | शहा सुरेंद्र रमणलाल | १७.०४.२०१५ |
| १८. | ३३०१७ | जाधव महेश शंकर | २३.०४.२०१५ |
| १९. | २५३७५ | सरोदे अशोक बाबुराव | २५.०४.२०१५ |
| २०. | १९२०१ | शेणॉय वत्सला विश्वनाथ | २८.०४.२०१५ |
| २१. | ४९९७९ | जोशी रामकृष्ण गणेश | २९.०४.२०१५ |
| २२. | ३४२५१ | येरम चंद्रकांत हरिश्चंद्र | १२.०५.२०१५ |
| २३. | ६७८४ | जाधव दिनेश दत्तात्रय | १६.०६.२०१५ |
| २४. | ४८४५२ | पामनानी शकुंतला खेमचंद | १८.०६.२०१५ |
| २५. | ३७२९ | लेले दिगंबर श्रीधर | १९.०६.२०१५ |
| २६. | ५०२९३ | भोईर रामचंद्र महादू | २१.०६.२०१५ |
| २७. | ३५६३२ | सासे चिंतामण सखाराम | ०१.०७.२०१५ |
| २८. | ४२५६५ | वझे सचिन शरद | ०६.०७.२०१५ |
| २९. | ४९६५१ | पेडणेकर वर्षा काशिनाथ | ०९.०७.२०१५ |
| ३०. | १७४२० | सोनावणे मंगला रमेश | १२.०७.२०१५ |

| अनु. क्र. | सभासद क्र. | सभासदाचे नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| ३१. | १३०९ | देव सुभाष हेरंब | १२.०७.२०१५ |
| ३२. | ४८०७ | मनोरे प्रभावती पुरुषोत्तम | १५.०७.२०१५ |
| ३३. | ३८७२९ | कोर काशिनाथ रघुनाथ | १८.०७.२०१५ |
| ३४. | ४४१२३ | परांजपे जयंत त्रिंबक | १९.०७.२०१५ |
| ३५. | ४१००७ | खांबेकर नितीन शिवराम | २७.०७.२०१५ |
| ३६. | १५०११ | भारसाखळे राधाबाई गणपत | २७.०७.२०१५ |
| ३७. | ११८८० | सोनी जयंतकुमार केशवलाल | २७.०७.२०१५ |
| ३८. | २३९६५ | पाटील बाळकृष्ण दत्तात्रय | २८.०७.२०१५ |
| ३९. | १६०६९ | धयाळकर रामदास शंकर | २८.०७.२०१५ |
| ४०. | १२२४३ | मिरचंदानी अशोक फत्तेचंद | ०५.०८.२०१५ |
| ४१. | २७४७१ | चव्हाण लखनलाल धन्नालाल | ०७.०८.२०१५ |
| ४२. | ३५७९७ | जोशी विजया नारायण | १०.०८.२०१५ |
| ४३. | ३५३९५ | कारभारी विजय बळीराम | ११.०८.२०१५ |
| ४४. | ४७९१५ | कंक विठ्ठल रामचंद्र | १८.०८.२०१५ |
| ४५. | ३५९३६ | पनवार राजेंद्रसिंग | २२.०८.२०१५ |
| ४६. | १४०७२ | डे अजितकुमार जतिंद्र | २३.०८.२०१५ |
| ४७. | २३७२९ | भोईर हेमंत गणू | २४.०८.२०१५ |
| ४८. | ११४२७ | मणियार पुष्पलता श्रीकृष्ण | २६.०८.२०१५ |
| ४९. | ६२३३ | नागपूरकर सदाशिव कोठू | ०१.०९.२०१५ |
| ५०. | २७७० | मोरे गणपत वामन | ११.०९.२०१५ |
| ५१. | १०१३९ | जंजिरे विठ्ठल भाऊसाहेब | १२.०९.२०१५ |
| ५२. | १५५४२ | शर्मा जितेंद्र नारायण | १२.०९.२०१५ |
| ५३. | ४३१०६ | पाध्ये शशिकांत प्रभाकर | २०.०९.२०१५ |
| ५४. | ३३६२८ | नारंग रमेश किशनचंद | २२.०९.२०१५ |
| ५५. | १८६९६ | गद्रे शंकर कृष्णाजी | २६.०९.२०१५ |
| ५६. | २२९७२ | गणपुले वसंत केशव | ०१.१०.२०१५ |
| ५७. | ३०७८४ | जोशी रमाबाई विष्णू | ११.१०.२०१५ |
| ५८. | २४७८४ | कारिया हंसा अनंतराय | ११.१०.२०१५ |
| ५९. | ३५१४७ | भागडे गोविंद देवराम | २३.१०.२०१५ |
| ६०. | ५६३२० | कुलकर्णी शामराव गुंडोपंत | २४.१०.२०१५ |
| ६१. | ५३१३१ | नेहेरे तारा जयवंत | ०१.११.२०१५ |

| अनु. क्र. | सभासद क्र. | सभासदाचे नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| ६२. | २६३३ | परांजपे सुमित्रा वसंत | ०२.११.२०१५ |
| ६३. | २६०७३ | जाधव रमेश दगडू | ०९.११.२०१५ |
| ६४. | ४८६४१ | डग्गा प्रेम बिशंभर | ०९.११.२०१५ |
| ६५. | २०३३६ | कोथवले सत्यवान महादेव | १७.११.२०१५ |
| ६६. | ४९९३७ | रोठे नरेंद्र दत्तात्रय | २२.११.२०१५ |
| ६७. | ३१७५७ | भोसले तानाजी दादासाहेब | २३.११.२०१५ |
| ६८. | २८६२९ | बजेंद्र गुंडप्पा बसन्ना | ०२.१२.२०१५ |
| ६९. | ३१२६२ | चव्हाण संजय नानजी | ०३.१२.२०१५ |
| ७०. | २४ | भिडे रामकृष्ण वासुदेव | ०६.१२.२०१५ |
| ७१. | २७३३३ | मोटवानी राम जयमतराय | १६.१२.२०१५ |
| ७२. | २२८८८ | मलगी पद्मावती श्रीनिवास | १८.१२.२०१५ |
| ७३. | ९६६३ | गनी मुबारक अब्दुल | २४.१२.२०१५ |
| ७४. | १९१५६ | मुसळे ज्ञानदेव बाजीराव | २८.१२.२०१५ |
| ७५. | ८८५८ | दिनोदिया बाबुलाल धनजी | २८.१२.२०१५ |
| ७६. | २८९७३ | एकबोटे उषा मधुसूदन | २९.१२.२०१५ |
| ७७. | २९९१२ | गडकरी अशोक दत्तात्रय | ०७.०१.२०१६ |
| ७८. | २१११० | हुरगट मदन गौरुलाल | ०९.०१.२०१६ |
| ७९. | ३०२२७ | बोऱ्हाडे निलेश नाथा | ११.०१.२०१६ |
| ८०. | ५४०८५ | फुलवाणी पूनम इंदेरलाल | २४.०१.२०१६ |
| ८१. | १९१८६ | सोमण महादेव धुंडीराज | २६.०१.२०१६ |
| ८२. | ५१४९ | सोनोने आदिनात मांगो | १९.०२.२०१६ |
| ८३. | ४७९८१ | गिते काशिनाथ पुंडलिक | २१.०२.२०१६ |
| ८४. | ५०४२० | कुकडे अलका अशोक | २३.०२.२०१६ |
| ८५. | २०८४१ | कर्वे विभाकर शंकर | २५.०२.२०१६ |
| ८६. | २२८११ | चव्हाण वसंत रंगुजी | ०२.०३.२०१६ |
| ८७. | ९५५७ | देशमुख भालचंद्र माधव | ११.०३.२०१६ |
| ८८. | ११०५४ | पाटील चिंतामण चंद्रराव | १२.०३.२०१६ |
| ८९. | ५५२३ | कानेटकर आत्माराम शंकर | १३.०३.२०१६ |
| ९०. | ४१५०० | फाळके त्रिंबकराव गोपाळ | १४.०३.२०१६ |
| ९१. | ४४०३५ | जोशी कमलाकर माधव | १७.०३.२०१६ |
| ९२. | १००४९ | पणशीकर शशिकांत हरिभाऊ | २१.०३.२०१६ |

| अनु. क्र. | सभासद क्र. | सभासदाचे नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| ९३. | २४७४२ | भागडे देशमुख पांडुरंग | २३.०३.२०१६ |
| ९४. | ५०३८० | दिवेकर विनायक काशिनाथ | २५.०३.२०१६ |
| ९५. | ९०२० | डिसुझा अलोयसियस पॉल | २७.०३.२०१६ |
| ९६. | ३२५१४ | चंद्रात्रे रमाकांत रघुनाथ | १५.०४.२०१६ |
| ९७. | २९३९ | पाटील नामदेव भीमराज | १७.०४.२०१६ |
| ९८. | ५७१७३ | सुचक मिहिर दिलिप | २३.०४.२०१६ |
| ९९. | ४९०३३ | कणसे देवराम बाळकृष्ण | २७.०४.२०१६ |
| १००. | ४९६५० | पेडणेकर काशिनाथ लाडू | २९.०४.२०१६ |
| १०१. | १९९७६ | दिवेकर मीनाक्षी विनायक | २२.०५.२०१६ |
| १०२. | ४९६७७ | पवार चंद्रकांत शिवराम | २८.०५.२०१६ |
| १०३. | ३७४९२ | भंडारी सोनूबाई बुधाजी | ०१.०६.२०१६ |
| १०४. | ७७१५ | काणे दत्तात्रय वासुदेव | ०२.०६.२०१६ |
| १०५. | ४५ | धामणकर वसंत दामोदर | ०३.०७.२०१६ |
| १०६. | १६१३७ | सावरकर पांडुरंग वासुदेव | |

यानंतर मा. अध्यक्ष ॲड. सुरेश पटवर्धन यांनी सर्व उपस्थित सभासदांचे पुन्हा एकदा स्वागत केले. दि ठाणे जिल्हा कर्मचारी महासंघ या मान्यताप्राप्त संघटनेची युनियन आपल्या बँकेत कार्यरत आहे. या संघटनेतर्फे कार्यलक्षी संचालक म्हणून श्री. मिलींद भालचंद्र रेडे व श्री. सुनिल विठ्ठल सावंत यांची नावे महासंघाने सुचविली होती. त्यानुसार  दि. ७ ऑगस्ट २०१६ पासून श्री. रेडे व श्री.सावंत हे कार्यलक्षी संचालक म्हणून संचालक मंडळामध्ये रुजू झाले आहेत. त्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

बँकेचे अध्यक्ष मा. ॲड. सुरेश पटवर्धन यांचे अध्यक्षीय भाषण झाले.

सुरुवातीस बँकेचा एकत्रित व्यवसाय ₹ ४००० कोटींचे वर झाला असल्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले. तसेच सन २०१८ पर्यंत एकत्रित व्यवसाय ₹ ५००० कोटी व ५० शाखा असे बँकेचे ध्येय असून, त्यादिशेने बँकेची वाटचाल सुरु झाली असल्याचे सांगितले. त्यानंतर दृकश्राव्य माध्यमातून मा. अध्यक्षांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा सभेसमोर सादर केला.

मा. अध्यक्षांनी सांगितले की 'One Team One Aim' हे आपल्या बँकेचे ब्रीदवाक्य आहे. सांघिकरित्या बँकेला वैभवशिखरावर नेणे हेच आपले ध्येय आहे.

सन २०१४-१५ मध्ये भागभांडवल ₹ ६१.३८ कोटी होते. त्यात ₹ ४.४३ कोटींची वाढ होऊन सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात बँकेचे भागभांडवल ₹ ६५.८१ कोटी इतके झाले आहे. ७.२२% ने भागभांडवल वाढले आहे. राखीव निधी ₹ १२७.३७ कोटींवरुन ₹ १३३.९७ कोटी झाले आहेत. राखीव निधीत ५.३४% नी

वाढ झाली आहे. २०१४-१५ मध्ये सभासद संख्या ४८०७५ एवढी होती. २०१५-१६ मध्ये सभासद संख्या २८७२ ने वाढून ५०९४७ झाली आहे.

बँकेच्या एकूण ठेवी २०१४-१५ या आर्थिक वर्षाखेरीस ₹ १९०५.९२ कोटी होत्या. त्यामध्ये वाढ होऊन २०१५-१६ आर्थिक वर्षअखेर ₹ २३०७.६८ कोटी इतक्या झाल्या आहेत. ठेवींमध्ये २१.०८% वाढ झालेली आहे. बँकेची एकूण कर्जे २०१४-१५ अखेर ₹ १३३६.६३ कोटी होती. त्यामध्ये वाढ होऊन २०१५ -१६ अखेर एकूण कर्जे ₹ १५८१.१० कोटी इतकी झाली आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत कर्जांमध्ये १८.२९% इतकी वाढ झाली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार भांडवल पर्याप्तता (Capital Adequacy) प्रमाण ९% पेक्षा अधिक असले पाहिजे. बँकेने २०१५-१६ अखेर भांडवल पर्याप्तता प्रमाण १२.९५% इतके राखलेले आहे.

बँकेचा निव्वळ नफा सन २०१४-१५ साली ₹ २२.०४ कोटी होता, सन २०१५-१६ यावर्षी निव्वळ नफा ₹ २४.१६ कोटी इतका झालेला आहे. नफ्यामध्ये ९.६२% वाढ झालेली आहे.

सन २०१४-१५ साली कर्मचारी उत्पादकता ₹ ७.२४ कोटी होती त्यामध्ये ₹ १.३१ कोटी एवढी वाढ होऊन यावर्षी ₹ ८.५५ कोटी इतकी आहे. कर्मचारी उत्पादकता १८.०९% नी वाढली आहे.

सन २०१४-१५ मध्ये बँकेच्या ढोबळ अनुत्पादित कर्जाचे (Gross NPA) प्रमाण २.५८% पर्यंत होते. तर निव्वळ अनुत्पादित कर्जे (Net NPA) ०.४९% होती. ढोबळ व निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ह्यावर्षी अनुक्रमे ३.७६% व १.९३% एवढे आहे. ढोबळ अनुत्पादित कर्जांचे व निव्वळ अनुत्पादित कर्जांचे प्रमाण रिझर्व्ह बँकेच्या मापदंडानुसार मर्यादित आहे.

आपल्या बँकेचा एकत्रित व्यवसाय (Mix Business) जर बघितला, तर तो २०११-१२ ला ₹ १९०९ कोटी झाला. २०१२-१३ ला ₹ २२४० कोटी, २०१३-१४ ला ₹ २७१० कोटी, २०१४-१५ अखेरीस ₹ ३२४३ कोटी तर २०१५-१६ अखेरीस ₹ ३८८९ कोटी इतका झालेला आहे.

आर्थिकदृष्टया सक्षम व सुव्यवस्थापित बँकांसाठी असलेले रिझर्व्ह बँकेचे जे मापदंड आहेत ते सभेस समजावून सांगितले. सदर सर्व मापदंड आपल्या बँकेने पाळलेले आहेत. भांडवल पर्याप्तता प्रमाण, Gross NPA, Net NPA चे प्रमाण, सतत तीन वर्षे नफा, CRR व SLR ची पातळी हे मापदंड रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार पूर्ण केले आहेत.

लेखापरीक्षण व तपासणी याबाबत माहिती देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की, मागील वर्षी दि. १३.०९.२०१५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेने अहवाल सालाकरिता वैधानिक लेखापरीक्षक म्हणून मे. किर्तने अँड पंडीत या फर्मची नियुक्ती केली. मे. किर्तने अँड पंडीत यांनी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षाकरिताचा अहवाल सादर केला असून, बँकेस 'अ' वर्ग दिला आहे.

दि. ३१ मार्च २०१६ अखेर बँकेच्या ३८ शाखा होत्या. लवकरच अंबड रोड नाशिक, पुणे येथे अप्पा बळवंत चौक व वाघोली तसेच भिवंडी येथे नवीन शाखा सुरु होणार आहेत.

लवकरच आपली बँक बहुराज्यीय दर्जा मिळविण्यासाठी अर्ज करणार आहे. शेजारच्या गुजरात राज्यातील सुरत येथे शाखा सुरु करण्याचा विचार आहे. यासंबंधीचा विषय बँकेचे तज्ज्ञ संचालक श्री. सचिन आंबेकर आपल्यापुढे मांडतील.

संगणकीकरण व तंत्रज्ञान क्षेत्रातही आपली बँक मागे नसून सर्व प्रकारच्या आधुनिक तंत्रज्ञान म्हणजेच सोशल मिडीयावरील Facebook, Google, You-tube, Internet Banking व Mobile Banking, रुपे डेबिट कार्ड, E-Commerce अशा सर्व प्रकारच्या सुविधा आपण ग्राहकांना उपलब्ध करुन दिल्या आहेत. दि. १९ जुलै २०१६ रोजी म्हणजेच गुरुपौर्णिमेच्या दिवशी आपल्या रामबाग शाखेत ई-लॉबीचे उद्‌घाटन नगरसेविका सौ. वीणा जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

ई-लॉबीमध्ये पैसे भरण्याचे मशीन, पैसे काढण्याचे मशीन म्हणजेच ATM, Coin Vending Machine, Passbook Printing व Cheque Drop Box एकाच ठिकाणी उपलब्ध करुन दिले आहे. मुख्य शाखेतही ATM मशीन आहे तिथे Cash Depositary Machine, Passbook Printing व Cheque Drop Box ची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

बँकिंग सेवेव्यतिरिक्तही अन्य काही सेवा आपली बँक ग्राहकांना देत आहे. त्यापैकी एक म्हणजे Franking सेवा काळातलाव शाखेमार्फत दिली जाते. अहवाल सालात सुमारे ९२००० कागदपत्रे नोंदवली असून त्यापोटी बँकेस ₹ ९.३४ लाख इतके उत्पन्न मिळाले आहे.

बँक २०११ पासून कोटक लाईफ इन्शुरन्स व २०१४ पासून दि न्यु इंडिया ॲश्युरन्स कं. या भारतातल्या सर्वात मोठया सर्वसाधारण विमा कंपनीचे कॉर्पोरेट एजंट म्हणून कार्यरत आहे. तसेच भारत सरकारतर्फे सुरु करण्यात आलेल्या प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत ११९३६ व प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजनेअंतर्गत ४९१३ खातेदारांनी नोंदणी करुन या योजनेचा लाभ घेतला आहे.

कोटक लाईफ इन्शुरन्स कंपनी यांचेकडून ८३१ ग्राहकांनी जीवन विमा योजनेचा लाभ घेतला असून त्यामधून बँकेस ₹ ७१.०२ लाख कमिशन मिळाले आहे. तर १०८८ ग्राहकांनी न्यु इंडिया ॲश्युरन्स कंपनी यांचे कडून सर्वसाधारण विमा घेतला असून यामधून ₹ ७.३१ लाखांचे कमिशन बँकेला मिळाले आहे.

**पुरस्कार :** यानंतर अहवाल वर्षात बँकेला जे विविध पुरस्कार मिळाले त्याबद्दलची माहिती मा. अध्यक्षांनी सभेस दिली.

१. बुधवार दि. २० एप्रिल २०१६ रोजी दि महाराष्ट्र अर्बन को- ऑप. बँक्स फेडरेशन लि. यांचेतर्फे बँकेस द्वितीय क्रमांकाचा 'बेस्ट इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी बँक ॲवार्ड २०१५' चा पुरस्कार प्राप्त झाला.

हा पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे सहकार व सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील यांचे हस्ते प्रदान करण्यात आला.

२. बँकिंग फ्रंटियर मासिकातर्फे २०१४-१५ करिताच्या मोठया सहकारी बँकांच्या गटात Best Youth Customer Initiative आणि Best Data Security पुरस्कार दि. १०.१०.२०१५ रोजी बँकेस मिळाला आहे.

**नवीन शाखा :** यानंतर मा. अध्यक्षांनी अहवाल वर्षातील ठळक घटनांबाबत सभेस माहिती दिली.

१. बँकेच्या नांदिवली-मलंग रोड, शाखेचे उद्‌घाटन दि. ०१.०८.२०१५ रोजी मा. आमदार श्री. किसनराव कथोरे यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या कल्याण पूर्व तालुक्यातील संघचालक डॉ. विवेक मोडक हे उपस्थित होते.

२. दि. ३०.०८.२०१५ रोजी टिटवाळा शाखेचे उद्‌घाटन झाले. सदर उद्‌घाटन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे माजी उपमहापौर श्री. राहुल दामले यांच्या हस्ते झाले. या उद्‌घाटनप्रसंगी टिटवाळा महागणपती मंदिराचे विश्वस्त श्री. सुभाष जोशी व मांडा-टिटवाळा येथील नगरसेविका सौ. उपेक्षा भोईर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

३. दि. १०.०९.२०१५ रोजी बँकेच्या पनवेल शाखेचे उद्‌घाटन मा. आमदार श्री. प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

४. दि. २४.११.२०१५ रोजी डोंबिवली येथील दुसऱ्या शाखेचे म्हणजेच शहीद भगतसिंग रोड शाखेचे उद्‌घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह मा. श्री. भैय्याजी जोशी यांच्या हस्ते करण्यात आले.

५. दि. १०.०१.२०१६ रोजी बँकेच्या कोन शाखेचे उद्‌घाटन तत्कालीन सहकारमंत्री व सध्याचे महसूलमंत्री मा. चंद्रकांतदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्‌घाटनप्रसंगी महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष मा. श्री. शेखर चरेगावकर आणि भिवंडी लोकसभा मतदार संघाचे खासदार मा. श्री. कपिल पाटील उपस्थित होते.

६. यानंतर दि. २१.०२.२०१६ रोजी पुणे येथील वारजे आणि बिबवेवाडी या दोन शाखांचे उद्‌घाटन झाले. बिबवेवाडी शाखेचे उद्‌घाटन मा. शिवशाहीर श्री. बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विद्याभारती, पश्चिम क्षेत्र महाराष्ट्र विभागाचे अध्यक्ष मा. श्री. शरदराव कुंटे उपस्थित होते.

**सभासद प्रशिक्षण :**

१. सभासद प्रशिक्षणासंदर्भातील विषय मा. संचालक डॉ. संदीप जाधव मांडतीलच. परंतु, या प्रशिक्षणाअंतर्गत दि. ०८.११.२०१५ रोजी सहकार मंदिर कल्याण येथे इंटरनेट व मोबाईल बँकिंग या विषयावर प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आला होता.
२. तसेच दि. ०८.०३.२०१६ रोजी डोंबिवली गोग्रासवाडी शाखेत महिला दिनानिमित्त स्थानिक ग्राहक व सभासदांना व उपस्थित महिलांना इंटरनेट व मोबाईल बँकिंग वापराबाबत माहिती दिली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून मा. सौ. सुधाताई म्हैसकर लाभल्या होत्या.
३. दि. ०६.०३.२०१६ रोजी अर्थसंकल्पावरील व्याख्यानात प्रसिध्द अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर यांनी अर्थसंकल्पाचे विश्लेषण केले.
४. दि. २०.०४.२०१६ रोजी तळेगाव शाखेच्या प्रथम वर्धापनदिनी प्रसिध्द अर्थतज्ज्ञ डॉ. विनायक गोविलकर यांचे 'पैशाचा प्रवास' या विषयावर सभासद प्रशिक्षणाअंतर्गत व्याख्यान झाले. यास तळेगाव शाखेच्या सभासद व ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

**विशेष उपक्रम:** यानंतर बँकेने जे 'विशेष उपक्रम' राबविले. त्याबाबतची माहिती मा.अध्यक्षांनी सभेस दिली.

१. वाडेघर जवळील सर्कलचे सुशोभिकरण करण्यासाठी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने बँकेस परवानगी दिली होती. या ठिकाणी बँकेने छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराची प्रतिकृती उभारली आहे. हा उद्‌घाटन सोहळा दि. १४.०४.२०१६ रोजी संपन्न झाला. यावेळी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे महापौर मा. श्री. राजेंद्र देवळेकर, खासदार मा. श्री. कपिल पाटील व स्थानिक नगरसेवक मा. श्री. वरुण पाटील उपस्थित होते.
२. दि. ३०.१०.२०१५ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांनी बँकेच्या मुख्य कार्यालयास सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी दुष्काळग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीस ₹ ५.०० लाख व जलयुक्त शिवार योजनेसाठी ₹ १.०० लाखांचा धनादेश मा. मुख्यमंत्री यांचेकडे सुपूर्द करण्यात आला.
३. दि. ०९.०८.२०१५ रोजी 'विद्यार्थी प्रावीण्य पुरस्कार' सोहळा पार पडाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिध्द मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी लाभले होते.
४. दि. ०५.०९.२०१५ रोजी शिक्षकदिनानिमित्त विविध शाखांनी निरनिराळया शाळेत, महाविद्यालयात जाऊन तेथील शिक्षकांचा सत्कार केला. त्यांचेप्रती आदर व्यक्त केला.
५. बँकेला होणाऱ्या नफ्याच्या १% रक्कम बँक धर्मादाय निधी स्वरुपात विविध संस्थांना वितरीत करते. यंदाच्या धर्मादाय निधी वितरण कार्यक्रमास मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे विशेष अधिकारी श्री. श्रीकांत भारतीय हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

६. दि. २३.०८.२०१५ रोजी बँकेचे इंटरनेट बँकिंग व मोबाईल बँकिंग या दोन सेवांचे उद्घाटन IIT मुंबईचे संगणक विभागप्रमुख डॉ. दीपक फाटक व Persistent Systems Ltd., चे संस्थापक, व्यवस्थापकीय प्रमुख डॉ. आनंद देशपांडे यांच्या हस्ते झाले.

One Team One Aim - सांघिकरित्या बँकेला वैभव शिखरावर नेणे हेच बँकेचे ध्येय आहे. गेली ४३ वर्षे बँक याच ध्येयाने कार्यरत आहे व यापुढेही याच ध्येयाने आपण कार्यरत राहू असा विश्वास व्यक्त करुन मा. अध्यक्षांनी सर्व सभासदांना धन्यवाद देऊन दृकश्राव्य माध्यमातील अध्यक्षीय भाषण संपवले.

यानंतर विषय क्र. २ व ३ हे वैधानिक लेखापरीक्षणासंदर्भात असून ते मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी, तज्ज्ञ संचालक श्री. महेश्वर मराठे यांना सांगितले.

**विषय क्र. : दि. ३१.०३.२०१६ रोजी संपलेल्या वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल आणि वैधानिक लेखापरीक्षकांनी तपासलेला ताळेबंद, नफातोटा पत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल स्वीकृत करणे.**

मा. तज्ज्ञ संचालक सी.ए. श्री. महेश्वर मराठे यांनी सदर विषयावर विस्तृत टिप्पणी केली. 'विना संस्कार नही सहकार व विना सहकार नही उद्धार' हे तत्व आपण सर्वजण पाळत असतो. सर्व सभासदांचे स्वागत करुन त्यांनी आपला विषय मांडला.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील घडामोडी व वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाबाबत सांगताना जागतिक अर्थकारण, भारतातील बँकिंग क्षेत्रातील घडामोडी, रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्त्वे आणि या सगळयाचा बँकिंग क्षेत्रावर झालेला परिणाम याचे तौलनिक स्वरुपात विश्लेषण एप्रिल २०१६ मध्ये International Monitory Fund यांनी Global Financial Stability Report मध्ये दिले होते.

यानुसार विकसित आर्थिक क्षेत्रामध्ये जोखमीचे प्रमाण जास्त होते. तसेच आर्थिक परिस्थिती खूपच नाजूक होती.

विकसनशील आर्थिक क्षेत्राला याचा थोडा फायदा मिळाला. यावर उपाय म्हणजे काही पॉलिसी तयार कराव्यात असे IMF चे विचार आहेत. IMF च्या रिपोर्टनुसार विकसनशील आर्थिक क्षेत्राला प्रगतीसाठी नक्कीच संधी असेल. भारतातील आर्थिक परिस्थितीचा विचार केला तर गेली दोन वर्षे देशात दुष्काळाची परिस्थिती होती. आपला देश कृषीप्रधान असल्यामुळे पावसाच्या अनिश्चिततेचा परिणाम आर्थिक परिस्थितीवर नक्कीच झाला आहे. भारतीय

अर्थव्यवस्थेबद्दल सांगताना श्री. महेश्वर मराठे म्हणाले की, अनेक सरकारी योजनांमुळे देशातील GDP मध्ये येत्या काही वर्षात ७.५% व त्याहून अधिक वाढ दिसून येईल.

सहकारी बँका या छोटया उद्योजकांना मदत करत असतात. SME अंतर्गत छोटया उद्योजकांना कर्जे वितरीत होतात. Make in India, Startup India, नवीन येणारी Standup India अशा अनेक योजना सरकार राबवित आहे आणि म्हणूनच SME क्षेत्रात अनेक व्यवसायवृध्दीच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत.

सरकारच्या "स्मार्ट सिटी" योजनांमुळे गुंतवणूकीचा स्त्रोत वाढेल. निरनिराळया क्षेत्रात सुसूत्रता येण्यासाठी नवनवीन कायदे येत आहेत.

Insolvency and Bankruptcy Code २००५ या कायद्यामुळे SME क्षेत्राला आधार मिळेल.

रिझर्व्ह बँकेने जून २०१६ मध्ये सादर केलेल्या अहवालानुसार, बँकिंग सेक्टरमध्ये ढोबळ अनुत्पादित कर्जांचे प्रमाण मार्च २०१३ मध्ये ३.४७% होते. तर मार्च २०१५ मध्ये हे प्रमाण ४.६% इतके होते. तर निव्वळ अनुत्पादित कर्जांचे प्रमाण २.५% होते.

सप्टेंबर २०१५ मध्ये ढोबळ अनुत्पादित कर्जांचे प्रमाण ५.१% होते. तर निव्वळ अनुत्पादित कर्जांचे प्रमाण २.८% एवढे होते. मार्च २०१६ मध्ये ढोबळ अनुत्पादित कर्जे ७.६% तर निव्वळ अनुत्पादित कर्ज ४.६% होती.

रिझर्व्ह बँकेच्या मापदंडानुसार हे प्रमाण ७% च्या आत व निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ३% पर्यंत असणे आवश्यक आहे. मार्च २०१६ मध्ये प्रथमच बँकिंग क्षेत्राने हे प्रमाण राखलेले नाही. २०१७ मध्ये अनुत्पादित कर्जांचे प्रमाण ८.५% असेल असा रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे. त्यामुळे पुढील काही काळ हा बँकिंग Industry साठी कठीण असेल.

या पार्श्वभूमीवर आपल्या बँकेचा विचार केला असता, आपली ढोबळ अनुत्पादित कर्जे ३.७६% असून निव्वळ अनुत्पादित कर्जे १.९४% इतकी आहेत. म्हणजेच रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक मापदंडानुसार अनुत्पादित कर्जांचे प्रमाण बँकेने राखले आहे.

ठेवी व कर्जे यांच्या वाढीबाबतची माहिती श्री. मराठे यांनी सांगितली. सन २०१५ मध्ये राष्ट्रीयकृत बँकांच्या ठेवी ९% ने वाढल्या तर २०१६ साली हे वाढीचे प्रमाण केवळ ५% एवढे होते. Private Sector बँकांच्या ठेवी वाढीचा दर २०१५ मध्ये १५% इतका होता. तो २०१६ मध्ये २५% टक्के इतका झाला.

एकूणच बँकिंग क्षेत्रात ठेवी वाढीचा दर २०१५ मध्ये १०% इतका होता तर २०१६ मध्ये तो ८% इतका झाला. आपल्या बँकेचा ठेवी वाढीचा दर २०१५ मध्ये २०% होता तर २०१६ मध्ये ठेवींमध्ये २१.०१% इतकी वाढ झाली.

कर्जाचा विचार केला तर राष्ट्रीयकृत बँकांचा कर्ज वाढीचा दर २०१५ मध्ये ७% इतका होता, तो २०१६ मध्ये कमी होऊन ४% वर आला. Private Sector बँकांनी मात्र यात चांगली कामगिरी केली. त्यांचा कर्जवाढीचा दर २०१५ मध्ये १५% इतका होता तो २०१६ मध्ये १७.१% पर्यंत गेला.

बँकिंग क्षेत्रातील कर्जवाढीचा दर २०१५ मध्ये ९% होता तर २०१६ मध्ये ८.८% इतका आहे.

आपल्या बँकेचा कर्जवाढीचा दर २०१५ मध्ये १९.३% होता तर २०१६ मध्ये १८.३% आहे. यानंतर बँकेच्या ३१ मार्च २०१६ रोजीच्या आर्थिक विवरणपत्रातील नोंदींचे सविस्तर विवेचन सभेपुढे मांडले. तसेच नफा-तोटा पत्रकातील नोंदींचे विस्तृत विवेचन त्यांनी केले. आर्थिक वर्ष २०१५-२०१६ मधील नोदींचे तौलनिक विवेचन सभेपुढे मांडले.

रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार सर्व आर्थिक निकषांची पूर्तता बँकेने केली असल्याचे सांगितले. वैधानिक लेखापरीक्षण अहवालातील ठळक मुद्दे त्यांनी सभेपुढे मांडले.

KYC ची पूर्तता बँक सतत करत असते. सर्व Statutory Dues बँकेने वेळेवर भरले आहेत. सर्व आर्थिक विवरणपत्रके BR Act १९४९ च्या कलम २९ बँकेच्या निर्देशानुसार केली आहेत. रोख मर्यादेचे पालन, कर्जखात्यांची Visit, आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता, याकडे विशेष लक्ष दयावे, असे नमूद केले आहे.

सिस्टिम ऑडिट व IS ऑडिटही बँकेने करुन घेतले आहे.

वैधानिक लेखापरीक्षक मे. किर्तने ॲन्ड पंडीत एल्. एल्. पी. या फर्मने '२०१५-२०१६' सालाकरिता बँकेस 'अ' वर्ग दिला असल्याचे सांगितले.

तसेच २०१४-१५ सालच्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाचा दोषदुरुस्ती अहवाल लेखापरीक्षक मे. वैशंपायन ॲन्ड पाध्ये यांचेकडे पाठवला होता. त्यांनी दोषदुरुस्ती पूर्तता अहवालाचे प्रमाणपत्र रजिस्ट्रार व बँकेस दिलेले असल्याचे श्री. मराठे यांनी सांगितले.

यानंतर एका सभासदाने बँकेच्या आर्थिक प्रगतीबद्दल संचालक मंडळ व बँकेच्या कामकाजाचे कौतुक केले. तसेच त्यांनी पुढील वर्षी अनुत्पादित कर्जांमध्ये घट होण्याची अपेक्षा व्यक्त केली. तसेच वैयक्तिक कर्जांमधील थकबाकीचे प्रमाण हे जास्त असल्याने त्यामधील वसूली अधिक प्रभावीपणे करावी असेही त्यांनी सांगितले.

यानंतर सभासद श्री. अक्षय पटवर्धन यांनी ताळेबंद संदर्भात पुढील प्रश्न विचारले.

१. Movement of NPA मध्ये २०१५ साली ₹ १९.२८ कोटीने वाढ झाली होती. ह्या वर्षी ₹ ३१.५० कोटीने वाढ झाली आहे. ही वाढ का झाली ? याबाबत बँकेचे काय ध्येयधोरण आहे? तसेच गेल्या वर्षी वसूली ₹ ६९९.०० लाख झाली होती, या वर्षी ₹ ३३०.०० लाख एवढी कमी झाली आहे. वसुली विभागाची कार्यक्षमता एवढी कमी का झाली याबाबत खुलासा करावा.

२. तसेच ताळेबंद पत्रकात दीर्घ मुदत कर्जांमध्ये वैयक्तिक कर्ज ₹ ५५५.२१ लाख इतकी असून गेल्या वर्षी ही कर्जे ₹ २६०.१८ लाख होती. वैयक्तिक कर्जांमध्ये NPA होण्याची शक्यता जास्त असताना बँक एवढया मोठया प्रमाणावर वैयक्तिक कर्जे का देते, याबाबत खुलासा करावा.

यावर उत्तर देताना संचालक श्री. मराठे यांनी सांगितले की, एकूणच बँकिंग क्षेत्रात NPA चे प्रमाण वाढलेले आहे. याचाच परिणाम म्हणून आपल्याही बँकेतील NPA चे प्रमाण वाढलेले आहे. परंतु हे प्रमाण रिझर्व्ह बँकेच्या आर्थिकदृष्टया सक्षम आणि उत्तम व्यवस्थापन असणाऱ्या बँकांसाठीच्या निकषांच्या अपेक्षेनुसार आहे. तसेच कर्ज वसुली विभाग सातत्याने कर्ज परतफेडीकरीता पाठपुरावा करीत असतो.

वैयक्तिक कर्जांमध्ये वाढ झाली असली तरी एकूण कर्जांचा विचार करता हे प्रमाण फार जास्त नाही. यामधील वाढ ही अवाजवी नाही.

याबाबत अधिक खुलासा करताना मा. संचालक श्री. आंबेकर यांनी सांगितले की, १९६३ साली बँकिंग क्षेत्रातील वाढ ६.३% इतकी होती आणि त्यानंतर २०१६ साली ही वाढ ९% इतकी आहे. अनुत्पादित कर्जांबाबत संचालक मंडळही दक्ष आहे. परंतु बँकिंग क्षेत्रातील NPA एका वर्षास ₹ ३.०९ लाख कोटींवरुन ₹ ५.८० लाख कोटीपर्यंत पोहोचले. ही बाब लक्षात घेता आपल्या बँकेचे NPA हे त्या तुलनेने कमी वाढले आहेत.

वैयक्तिक कर्जांमध्ये जरी वाढ झालेली दिसत असली तरी ही कर्जे चांगल्या कंपनीतील कर्मचाऱ्यांना दिली असून, या कर्जदारांचा दरमहा पगार हा आपल्या बँकेत जमा होतो. त्यामधून कर्जाचे हप्ते भरले जातात. त्यामुळे वैयक्तिक कर्जातील वाढ चांगल्या दृष्टीने झाली असल्याचे सांगितले.

यानंतर मा. अध्यक्षांनी विषय क्र. २ व ३ संदर्भातील ठराव मांडले.

ठराव क्र. ३ : दि.३१.०३.२०१६ रोजी संपलेल्या वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल आणि वैधानिक लेखापरीक्षक मे. किर्तने ॲण्ड पंडित यांनी तपासलेला ताळेबंद, नफातोटा पत्रक आणि त्यांचा लेखापरीक्षण अहवाल **मा. संचालक श्री. महेश्वर मराठे** यांनी सभेपुढे वाचून दाखविला त्यास ही सभा स्वीकृत करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. श्रीकृष्ण शंकर पाटील | सभासद क्र. १२१०४ |
| अनुमोदक : | श्री. देवीदास तोताराम सोनार | सभासद क्र. ३०३३३ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

**विषय : सन २०१४-१५ सालच्या वैधानिक लेखापरीक्षणाच्या दोषदुरुस्ती अहवालावर विचार करणे व तो स्वीकृत करणे.**

ठराव क्र. ४ : सन २०१४-२०१५ सालच्या वैधानिक लेखापरीक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल मा. संचालक श्री. महेश्वर मराठे यांनी सभेपुढे मांडला. त्यास ही सभा स्वीकृत करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. शशिकांत विश्वास पटवर्धन | सभासद क्र. १६१० |
| अनुमोदक : | श्री. निलेश मनोहर सारंग | सभासद क्र. ४८१९३ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

**विषय : संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१५-१६ सालच्या नफा वाटणीस मंजुरी देणे.**

मा. संचालक श्री. मोहन आघारकर यांनी २०१५-१६ सालची नफा वाटणी सभेपुढे मांडली. तसेच ह्या वर्षीही संचालक मंडळाने १५% लाभांश प्रस्तावित केला असल्याचे सांगितले.

याबरोबरच त्यांनी असेही सांगितले की, बँकिंग क्षेत्रातील नफावाढीचे प्रमाण हे घटले आहे. विविध कारणांमुळे ही वाढ मंदावली आहे. याचाही विचार संचालक मंडळ करत आहे. आतापर्यंत १५% लाभांश दिला आहे. नामांकित सहकारी बँकांचा लाभांशाचा दर हा १५% पेक्षा कमी असल्याचे सांगितले. गेल्या वर्षी नफ्यामध्ये २१% वाढ झाली होती. यावर्षी हे प्रमाण ९.६% इतके आहे. तसेच Net Interest Margin ही कमी होत आहे. त्यामुळे लाभांशाच्या दराबद्दल फेरविचार करण्याची गरज संचालक मंडळाला भासत आहे. तरीही लाभांशाचा दर ठेवींवरील दरापेक्षा जास्त असेल असे आश्वासन संचालक श्री. मोहन आघारकर यांनी दिले.

श्री. शिंपी यांनी धर्मादाय निधी कोणत्या संस्थांना दिला जातो याची माहिती दयावी, असे सांगितले. मा. संचालक श्री. मोहन आघारकर यांनी सांगितले की ज्या संस्थांचे रजिस्ट्रेशन झाले आहे व ऑडिट झाले आहे अशा संस्थांना फॉर्म देऊन महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे यांचेकडे पाठवितो व त्यांच्याकडून मंजुरी आल्यावर त्यांना निधी देण्यात येतो. धर्मादाय निधीच्या कार्यक्रमात संस्थांची नावे वाचून दाखविली जातात. परंतु प्रत्येक कार्यक्रमास सभासदांना आमंत्रण देणे शक्य नसते. कार्यक्रमाची माहिती शाखेत उपलब्ध असते.

ठराव क्र. ५ : सन २०१५-२०१६ या वर्षात निव्वळ नफा ₹२४,१५,८१,२००.०० इतका झाला आहे. संचालक मंडळाने नफा वाटणीस पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे. ती **मा. संचालक श्री. मोहन आघारकर** यांनी सभेसमोर मांडली. सदर नफा वाटणीस ही सभा मंजुरी देत आहे.

(₹)

| | |
|---|---|
| निव्वळ नफा<br>+ लाभांश मधील जादा तरतूद<br>मागील शिल्लक | २४,१५,८१,२००.००<br>१३,८०,०८०.००<br>५८,५६२.०० |
| **एकूण** | **२४,३०,१९,८४२.००** |
| **वाटणी**<br>राखीव निधी<br>लाभांश १५%<br>सर्वसाधारण मुक्त निधी<br>गुंतवणूक वध घट निधी<br>सभासद कल्याण निधी<br>निवडणुक निधी<br>शैक्षणिक निधी<br>धर्मादाय निधी<br>महोत्सव निधी<br>पुढील वर्षासाठी शिल्लक | <br>६,०८,००,०००.००<br>९,५५,००,०००.००<br>६,५०,००,०००.००<br>१,२०,००,०००.००<br>१५,००,०००.००<br>७,००,०००.००<br>३०,७५,०००.००<br>२४,००,०००.००<br>२०,००,०००.००<br>४४,८४२.०० |
| **एकूण** | **२४,३०,१९,८४२.००** |

सूचक : श्री. कमलाकर शिवराम जयवंत सभासद क्र. ५३३७

अनुमोदक : श्री. अशोक दत्तात्रय कल्याणकर सभासद क्र. ४४००

ठराव सर्वानुमते मंजूर.

**विषय : सन २०१६-२०१७ च्या अंदाजपत्रकाची नोंद घेणे.**

सन २०१६-१७ सालचे अंदाजपत्रकाबाबत मा. संचालक श्री. पद्मनाभ जोशी यांनी विवेचनात सांगितले की सन २०१६-१७ आर्थिक वर्षासाठी बँकेने ठेवींचे उद्दिष्ट ₹ २६५०.०० कोटी व कर्जाचे ₹ १८३५.०० कोटींचे ठेवले आहे. पुढील वर्षी एकत्रित व्यवसाय ₹ ४४८५.०० कोटी इतका होईल. तसेच नफा ₹ २५.१९ कोटी होईल असा अंदाज आहे.

श्री. अक्षय पटवर्धन यांनी Interest on OD, Borrowing & Refinance २०१५-१६ मध्ये ₹ १३४.१२ लाख होते त्याची २०१६-१७ साठी ₹ ४५०.०० लाखाची तरतूद केली आहे, एवढी वाढ होण्याचे कारण काय? असे विचारले.

GST मुळे बँकिंग क्षेत्रावर परिणाम होणार आहे तर त्याबाबत बँकेने काय विचार केला आहे? आणि ज्या संस्थांमध्ये ५० पेक्षा जास्त कर्मचारी आहेत तिथे Maternity Leave ६ महिने व Day Care ची सोय करणे गरजेचे आहे. तर बँकेने याबाबत कोणते धोरण योजले आहे ?

यास उत्तर देताना बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल ना. खिरवडकर यांनी सांगितले की Interest on OD, Borrowing & Refinance च्या तरतूदीमध्ये LTDR योजनेमुळे वाढ झाली आहे.

GST सर्व राज्यांमध्ये मंजूर होऊन, त्याची अंमलबजावणी झाल्यावरच बँकेस त्यानुसार धोरण आखता येईल. GST हा दि. ०१ एप्रिल, २०१७ पासून लागू होणार असल्याने २०१६-१७ वर त्याचा परिणाम होणार नाही. सध्या त्याबाबत काही ठरवणे उचित होणार नाही.

तसेच Maternity Leave बाबत राज्यसभेत कायदा मंजूर होऊन त्याची अंमलबजावणी लागू झाल्यावर बँक नक्कीच त्याचे पालन करेल. पण सध्या हे होऊ घातलेले निर्णय असल्यामुळे त्याबाबत कोणतेही धोरण आखता येत नाही.

श्री. शिंपी यांनी संचालक भत्ते अंदाजापेक्षा कमी खर्च झाल्याने समाधान व्यक्त केले .

ठराव क्र. ६ : सन २०१६-१७ सालचे अंदाजपत्रक **मा. संचालक श्री. पद्मनाभ जोशी** यांनी सभेपुढे मांडले व समजावून सांगितले. त्याची ही सर्वसाधारण सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. दिलीप पुंडलिक महाजन | सभासद क्र. ९३९६ |
| अनुमोदक : | श्री. किसन सोपान फेगडे | सभासद क्र. ५४४६८ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

**विषय : आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी अंतर्गत हिशेब तपासनीस, कर परीक्षक, गुंतवणूक लेखापरीक्षक व समवर्ती लेखापरीक्षक यांची नेमणूक करणे.**

सहकार विभाग व रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार बँकेच्या विविध शाखा, गुंतवणूक विभाग, KYC विभाग, संगणक विभागाचे समवर्ती व अंतर्गत लेखापरीक्षण, विविध CA फर्मकडून करुन घेत असतो. कामकाजात सुसूत्रता आणणे आणि सुधारणा करणे यासाठी त्याचा चांगला उपयोग होत असतो. बँकेचे कामकाज अधिक चांगल्या पध्दतीने होण्यासाठी लेखापरीक्षकांच्या नेमणुकीबाबतचा ठराव पुढीलप्रमाणे मांडण्यात आला.

ठराव क्र. ७ः आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी अंतर्गत हिशेब तपासणी, कर परीक्षण, गुंतवणूक लेखापरीक्षण व समवर्ती लेखापरीक्षण करणेकरिता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव **मा. संचालिका सौ. माधुरी वझे** यांनी सभेपुढे मांडला.

सदरप्रमाणे तपासनीसांची नेमणूक करण्याचा तसेच त्यांचा मेहेनताना ठरविण्याचा अधिकार ही सर्वसाधारण सभा संचालक मंडळास देत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | सौ. ज्योत्स्ना जयंत वाफडे | सभासद क्र. १६९०७ |
| अनुमोदक : | सौ. मीना मधुकर मराठे | सभासद क्र. ११४५७ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

**विषय : सन २०१६-१७ साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.**

सन २०१६-१७ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरिता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव मा. संचालक श्री. मिलींद नाईक यांनी सभेपुढे मांडला.

बँकेमध्ये समवर्ती, अंतर्गत लेखापरीक्षण, स्टॉक ऑडिट, EDP ऑडिट, वैधानिक लेखापरीक्षण, रिझर्व्ह बँक इन्स्पेक्शन अशी विविध लेखापरीक्षणे होत असतात.

यापैकी वैधानिक लेखापरीक्षणासाठी लेखापरीक्षकांच्या नेमणूक प्रक्रियेत २०१३ पासून बदल झाला आहे.

सहकार खात्याच्या नामतालिकेतील लेखापरीक्षकांनाच लेखापरीक्षण करता येते. आपल्या बँकेस 'अ' वर्ग असल्याने 'अ' वर्गातीलच लेखापरीक्षकांची नेमणूक करावी लागते.

आपल्याकडे आलेल्या एकूण ९ अर्जांपैकी मे. किर्तने अॅन्ड पंडीत एल्. एल्. पी. ही फर्म योग्य वाटते कारण या फर्मला लेखापरीक्षणाचा चांगला अनुभव आहे. फर्ममध्ये CA, ICWA झालेले कर्मचारी आहेत व फर्मचे पार्टनर ICAI च्या अनेक समित्यांवर कार्यरत आहेत. वैधानिक लेखापरीक्षकांच्या संकेतस्थळावर या फर्मने अर्ज केला आहे. याबाबींचा विचार करता २०१६-१७ करिता वैधानिक लेखापरीक्षणासाठी मे. किर्तने अॅन्ड पंडीत एल्. एल्. पी. या फर्मच्या नेमणूकीस व त्यांना नियमानुसार मेहनताना देण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

ठराव क्र. ८ : सन २०१६-१७ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरिता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव **मा.संचालक श्री. मिलिंद नाईक** यांनी सभेपुढे मांडला.

सन २०१६-१७ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या मे. किर्तने अॅन्ड पंडीत, एल. एल. पी. यांची नेमणूक करण्यास व नियमानुसार त्यांचा मेहेनताना देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. श्रीधर पांडुरंग पटवर्धन | सभासद क्र. १००५८ |
| अनुमोदक : | श्री. विवेक वसंत दहाडराय | सभासद क्र. २५८३९ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

**विषय :** **संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.**

संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे ही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार आहेत व त्याची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही.

संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबतचा ठराव **मा. संचालक श्री. हेमंत दरगोडे** यांनी मांडला.

ठराव क्र. ९ : संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे ही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार आहेत व त्याची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही, याची ही सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. श्रीकांत पांडुरंग जोशी | सभासद क्र. २३८४१ |
| अनुमोदक : | श्री. सुभाष लक्ष्मण सुकेणकर | सभासद क्र. ११६३७ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक डॉ. संदिप जाधव यांना सांगितले.

**विषय :** **सन २०१६-२०१७ मध्ये सभासदांना द्यावयाच्या प्रशिक्षण कार्यक्रमाची व मागील वर्षीच्या प्रशिक्षणाची नोंद घेणे.**

रिझर्व्ह बँक व सहकार कायदा यामुळे बँकेच्या कामकाजात वारंवार बदल होत असतात. बँकेच्या कामकाजाची माहिती सभासदांना देण्यासाठी बँक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करत असते. याबद्दलची माहिती मा. संचालक डॉ. संदिप जाधव यांनी सभेस दिली व पुढील ठराव सभेपुढे मांडला.

ठराव क्र.१० : बँकेच्या सभासदांना सन २०१६-१७ मध्ये द्यावयाच्या आणि सन २०१५-१६ मध्ये दिलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमाची माहिती **मा. संचालक डॉ. संदिप जाधव** यांनी सभेत सांगितली, याची सभेत नोंद घेण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. प्रशांत वसंत मुल्हेरकर | सभासद क्र. ७४७९ |
| अनुमोदक : | श्री. प्रमोद वसंत भानुशाली | सभासद क्र. ४३१४६ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

पुढील ठराव मांडण्यासाठी अध्यक्षांनी मा. संचालक श्री. रमेश गोरे यांना सांगितले.

**विषय : या सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.**

ठराव क्र. ११ : या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्याचा ठराव मा. संचालक श्री. रमेश गोरे यांनी सभेपुढे मांडला. अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती ही सभा क्षमापित करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. भास्कर काशिनाथ भावसार | सभासद क्र. २१६९८ |
| अनुमोदक : | श्री. महेंद्र खंडू शिंदे | सभासद क्र. १७७५० |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

**विषय : बँकेचे बहुराज्यीय बँकेत रुपांतर करण्यास आणि त्यानुसार बदलणाऱ्या उपविधींना मंजुरी देणे.**

बँकेचे बहुराज्यीय बँकेत रुपांतर करण्यास आणि त्यानुसार बदलणाऱ्या उपविधींना मंजुरी देण्याबाबतचा ठराव मा. तज्ज्ञ संचालक, सी.ए. श्री. सचिन आंबेकर यांनी सभेपुढे मांडला. बँकेचे बहुराज्यीय बँकेत रुपांतर करण्याकरिता आवश्यक असलेली नोंदणी प्रक्रिया चालू आहे. बहुराज्यीय बँकेत रुपांतर झाल्यानंतर बँकेस होणारे फायदे पुढीलप्रमाणे सांगण्यात आले.

१. शेडयुल्ड बँकेऐवजी मल्टीस्टेट शेडयुल्ड असा दर्जा मिळेल. सर्वसामान्यांचा बँकेकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलेल. आणखी स्तर उंचावेल.
२. आपले नियंत्रक (regulators) भारतीय रिझर्व्ह बँक यांचा मल्टीस्टेट बँकेकडे बघण्याचा दृष्टिकोन आणखी सकारात्मक आहे.
३. कर्जवसुलीची प्रक्रिया ही जास्त वेगवान होईल.
४. एखादया राज्यातील सहकार क्षेत्रात नकारात्मक घडामोडी झाल्या तर त्या राज्यात असलेल्या सहकारी संस्थांवर त्याचा जास्त वाईट परिणाम होतो. पण जर ती सहकारी संस्था अनेक राज्यात असेल तर कमी प्रमाणात परिणाम होतो म्हणजे जोखीम (Risk) विभागली जाते.

गुजरात राज्य का निवडले याची कारणमिमांसा देतांना त्यांनी सांगितले की आपले कार्यक्षेत्र असलेल्या राज्यास लागून असलेल्या राज्यात कार्यक्षेत्र वाढविण्यास लवकर संमती मिळते. गुजरात आपल्याजवळ असून बँकेचे मुख्य कार्यालय असलेल्या कल्याणपासून साधारणत: ४ ते ५ तासात तिथे पोहोचता येते. गुजरात राज्य हे विकासाच्या दृष्टीने प्रगतीपथावर आहे. सर्व राज्यांपैकी गुजरातमधील GDP ची वाढ ही सर्वात जास्त आहे. आपल्या बँकेचे जे ग्राहक आहेत, त्यांच्यापैकी बऱ्याच जणांचे गुजरात राज्याशी व्यावसायिक संबंध आहेत.

त्यामुळे व्यवसाय वाढीच्या दृष्टिकोनातून त्याचा आपल्या बँकेस फायदा होणार आहे. सुरत येथे शाखा उघडण्यास आपण प्रयत्नशील राहणार आहोत. सुरत येथे कापड व हिरे व्यवसाय तेजीत आहे. तिथे आपला चांगला व्यवसाय होईल. तसेच सुरत येथील जवळपास १०० व्यक्तिंनी बँकेचे सभासद व ग्राहक होण्याची इच्छा व्यक्त केली आहे आणि त्यासाठी लागणारी आवश्यक ती प्रक्रिया देखील पूर्ण करणार आहेत. या सर्व बाबींचा विचाार करुन गुजरात राज्य हे योग्य ठरत आहे.

त्यानंतर मल्टीस्टेट कायदयांतर्गत नोंदणी करण्याच्या प्रक्रियेची थोडक्यात माहिती दिली. बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य आहे ते शेजारच्या गुजरात राज्यात वाढविणे. त्या अनुषंगाने बँकेच्या उपविधींना मंजुरी देणे याचा आजच्या विषयात प्रामुख्याने समावेश आहे. तसेच नोंदणी प्रक्रियेच्या दृष्टीने सह्या करण्याचे अधिकार देणे, अशा एकूण ४ बाबींचा या ठरावात समावेश आहे. आजच्या वार्षिक सर्वसाधारण सभेने हा ठराव मंजूर केला की आपण भारतीय रिझर्व्ह बँक, सेंट्रल रजिस्ट्रार नवी दिल्ली, सहकार आयुक्त कार्यालय महाराष्ट्र राज्य व सहकार आयुक्त कार्यालय, गुजरात राज्य येथे आपण अर्ज करणार आहोत. भारतीय रिझर्व्ह बँक, सहकार आयुक्त महाराष्ट्र व सहकार आयुक्त गुजरात यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर सेंट्रल रजिस्ट्रार आपले सादर केलेले उपविधी तपासतील, त्यात ते काही बदल करायला सांगण्याची शक्यता आहे. त्याप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे. सदर बदल करण्याचे अधिकार देण्याबाबतचा ठरावही यामध्ये आहे. या सर्व प्रक्रियेस अंदाजे सहा महिने ते एक वर्ष कालावधी लागेल. उपविधी निश्चित झाल्यानंतर मल्टीस्टेट कायदयांतर्गत नोंदणी होईल अशी ही प्रक्रिया आहे.

त्यानंतर त्यांनी उपविधींमधील महत्वाच्या बदलांची माहिती सांगितली. नवीन उपविधी वार्षिक अहवालात पूर्ण दिलेले आहेत. मल्टीस्टेटमध्ये रुपांतर झाल्यानंतर महाराष्ट्र राज्य सहकारी कायदयाऐवजी मल्टीस्टेट ॲक्ट, २००२ लागू होईल. बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य व गुजरात राज्य असे होईल. आपले नियंत्रक (regulators) सहकार आयुक्त कार्यालय, पुणे याऐवजी सेंट्रल रजिस्ट्रार, नवी दिल्ली असतील. अधिकृत भागभांडवल ₹ १०० कोटीवरुन ₹ २०० कोटी करण्याचा प्रस्ताव आहे. कार्यक्षेत्रात आणि व्यवसायात वाढ होणार असल्याने भागभांडवल वाढवावे लागेल. सध्या सभासद होण्यासाठी ₹ २५/- चे ४० भाग म्हणजे ₹१०००/- चे भाग घेणे आवश्यक आहे. मल्टीस्टेटमध्ये हीच तरतूद पुढे कायम राहणार आहे. त्यामध्ये बदल नाही. भागभांडवलाचे Partial refund घेण्याची तरतूद सध्याच्या कायदयात नाही. मल्टीस्टेटच्या उपविधीमध्ये ती तरतूद आपण करीत आहोत. कायदयामध्ये ही तरतूद नाही. मल्टीस्टेट असलेल्या काही बँकांच्या उपविधीमध्ये Partial refund ची तरतूद असल्याने आपण ती करीत आहोत. परंतु ती मंजूर होईलच असे नाही. बँकेकडून किमान सेवा घेण्याबाबत जी सध्या तरतूद आहे, ती भागभांडवल ₹ १,५००/- आणि ₹ ७,०००/- च्या ठेवी किंवा ₹ १.०० लाखाचे कर्ज अशी आहे. हे निकष पूर्ण करणारा सभासद हा क्रियाशील सभासद होतो. मल्टीस्टेट अंतर्गत किमान सेवेमध्ये भागभांडवल ₹ १,०००/- आणि ₹ ५००/- च्या ठेवी किंवा ₹ १.०० लाखाचे कर्ज असा प्रस्ताव आहे. सभासदांच्या प्रकारात सामान्य सभासद त्यामध्ये पुन्हा क्रियाशील व अक्रियाशील सभासद, नाममात्र सभासद आणि सहसभासद असे वर्गीकरण सध्या आहे. मल्टीस्टेट मध्ये क्रियाशील, अक्रियाशील ही संकल्पना नाही. उर्वरित दोन्ही

तसेच आहेत. संचालक मंडळाची सध्या संख्या १५ आहे. प्रस्तावामध्ये ही ती आपण १५ च ठेवीत आहोत. त्यामध्ये फक्त कायद्यानुसार राखीव जागांमध्ये बदल आहे. मल्टीस्टेट कायद्यानुसार महिलांसाठी २ जागा आणि अनुसूचित जाती किंवा जमाती यांच्यासाठी १ जागा राखीव आहे. परंतु आपण एकूण संचालक मंडळाची संख्या तेवढीच ठेवली आहे. सध्याच्या उपविधीत उपसमित्यांच्या संख्येवर बंधन नाही. परंतु मल्टीस्टेट कायदयाअंतर्गत उपसमित्यांची संख्या ही Executive committee व्यतिरिक्त जास्तीत जास्त ३ असेल. संचालक मंडळाची निवडणूक लढविण्यासाठी जे पात्रतेचे निकष आहेत, ते सध्याच्या उपविधीनुसार जे आहेत म्हणजे ₹ १५,०००/- चे भागभांडवल व ₹ १.०० लाखाच्या ठेवी, ते तसेच आहेत. याव्यतिरिक्त आणखी महत्वाची तरतूद म्हणजे सदर व्यक्तीने दुसऱ्या कोणत्याही सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, Non-Banking Financial Company (NBFC) अथवा सरकारी देणे (Government dues) यामध्ये default केलेला नसला पाहिजे. अन्यथा तो निवडणूक लढवण्यास अपात्र ठरेल. मल्टीस्टेट कायदयांतर्गत संचालक मंडळाची निवडणूक घेण्यासाठी निवडणूक अधिकारी संचालक मंडळाने नेमायचा असतो. सदर अधिकारी हा बँकेचा सभासद अथवा कर्मचारी असता कामा नये. सदर कायद्यात निवडणूकीचे नियम दिलेले आहेत. त्या नियमांच्या आधीन राहून निवडणूकांचे आयोजन करावयाचे आहे. ह्या निवडणूका सर्वसाधारण सभेत घेतल्या जातात. सध्या नफा वाटणी ही २५% वैधानिक राखीव निधी आणि १०% सर्वसाधारण मुक्त निधी, अशी आहे. ती मल्टीस्टेट अंतर्गत तशीच राहणार आहे. सभासद कल्याण निधीची सध्याची मर्यादा १% होती, ती वाढवून २% करणार आहोत. शिक्षण निधी १% काढून ती रक्कम 'National Co-op. Union of India' यांना दयावी लागणार आहे. वसुलीसाठी लवाद (Arbitrator) नेमण्याची तरतूद आहे. सेंट्रल रजिस्ट्रार यांच्या पॅनलवर त्यांची arbitrator म्हणून नेमणूक झालेली असते, त्यांचीच निवड करावी लागते. आपण ज्यांची arbitrator म्हणून नेमणूक करु, त्यांच्याकडे आपल्या बँकेच्याच केसेस् जातील. त्यामुळे वसुलीची प्रक्रिया गतीमान होईल. याप्रमाणे त्यांनी बदलांची माहिती दिली आणि सर्व सभासदांना ठरावास मंजुरी दयावी, असे आवाहन केले. यानंतर पुढील ठराव मांडला.

**Resolution No. 12:** Our Bank has consistently retained the status of a "Financially Sound and well Managed Bank" as per the RBI's norms. Our Bank always observes directives & guidelines issued by regulator from time to time. Bank's performance has been marked by continuous growth, financially as also geographically.

Spreading out of the state for further expansion, Bank has decided to acquire the status of multi state. The subject was explained and placed before the meeting by Hon. Director, Shri. Sachin Ambekar. As also he had put forth proposed byelaws within the provisions of Multistate Co-op. Societies Act, 2002 & Rules there under as amended from time to time.

1) It is resolved that for acquiring `Multistate' status, area of operation of the Bank be extended to its adjacent State of Gujarat & application for conversion into Multistate be made to Central Registrar of Co-operative Societies, Delhi.

2) It is resolved that en-bloc amendments to the existing bye laws be approved to be in line with the provisions of Multistate Co-op. Societies Act, 2002 & Rules there under as amended from time to time.

3) It is resolved that application for conversion of The Kalyan Janata Sahakari Bank into Multistate Bank be signed, any one singly, by Chairman or Vice Chairman or Chief Executive Officer and be authorized to do necessary correspondence with Central Registrar of Co-operative Societies, Delhi in this regard.

4) It is resolved that Chairman or Vice Chairman or Chief Executive Officer, Shri. Atul Khirwadkar, any one singly, be authorized to accept / make alterations or additions to the proposed byelaws, as may be advised by the Central Registrar.

Proposed by: Shri Santosh Waman Kulkarni Membership No.: 16290

Seconded by: Shri Mangesh Laxman Patil Membership No.: 17120

Resolution passed unanimously

विषय पत्रिकेवरील सर्व विषय संपल्याने तसेच आयत्यावेळचे कुठलेही विषय नसल्याने मा. अध्यक्षांनी आभार प्रदर्शन करण्याबाबत बँकेचे उपाध्यक्ष मा. मधुसूदन पाटील यांना सूचित केले.

मा. उपाध्यक्ष श्री. मधुसूदन पाटील यांनी सर्व सभासदांचे आभार मानले. काही सभासदांनी उपयुक्त सूचना दिल्या याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. सभेसाठी हॉल उपलब्ध करुन देणारे नवरंग बँक्वेट हॉलचे व्यवस्थापक व सभेचे चित्रीकरण करणारे श्री. श्रीनिवास लेले यांचे आभार मानले. बँकेचे एक्झिक्युटिव्ह, अधिकारी, कर्मचारी यांना देखील धन्यवाद दिले.

यानंतर मा. अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

# दि कल्याण जनता सहकारी बँक लि.(शेड्युल्ड बँक)

## सभासद कल्याण निधी

### दि. १ एप्रिल २०१६ ते दि. ३१ मार्च २०१७ चा जमाखर्च

| जमा | | (रु.) | खर्च | | (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| आरंभीची शिल्लक | | | सभासदांच्या मृत्यूनंतर वारसांना दिलेली मदत | 1,26,000.00 | |
| बचत खाते | 17,86,846.49 | 17,86,846.49 | सभासदांना दिलेली वैद्यकीय मदत | 7,65,000.00 | |
| | | | सभासदांच्या वैद्यकीय तपासणीचे बिल | 2,000.00 | |
| | | | विद्यार्थी प्रावीण्य पुरस्कार | 1,66,714.00 | 10,59,714.00 |
| सन 2016-17 साठी बँकेकडून प्राप्त निधी | | 15,00,000.00 | | | |
| व्याज जमा | | | अखेरची शिल्लक | | |
| बचत खाते | 90,033.00 | 90,033.00 | बचत खाते | 23,17,165.49 | 23,17,165.49 |
| एकूण | | 33,76,879.49 | एकूण | | 33,76,879.49 |